नियमित दिवाणी दावा क्र. १७/२०१७
निशाण क्र. २०६ लगत

**वादीतर्फे साक्षीदार क्रमांक ०१ स्वतः वादी प्रकाश गोविंद शिंदे यांचा उलटतपास शपथेवर, प्रतिवादींतर्फे विधीज्ञा श्रीमती एस. ए. गिडये यांचेकडून –**

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, सदर प्रतिवादी क्र. ०१ ने माझ्या भावाच्या लाभात लिहुन दिलेल्या खरेदीखताबाबत या दाव्यात मी तक्रार केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकत मी या दाव्यामध्ये समाविष्ठ केलेली नाही. हे मला माहित नाही की, माझा भाऊ प्रमोद शिंदे याने सदर मिळकतीमधील काही क्षेत्र विजय कृष्णाजी दळवी यांना विक्री केले किंवा कसे.

**१४.** हे म्हणणे खरे आहे की, मी सज्ञान झाल्यानंतर फेरफार नोंद क्र. ७६१ आव्हानीत केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या वडीलांनी देखील त्यांच्या हयातीत फेरफार क्र. ७६१ आव्हानीत केली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, माझे वडील कायमस्वरुपी कोंडगाव येथे राहण्यास होते. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र. ०१ ते ०८ ची प्रतिवादी क्र. ०१ च्या नावे कुळ कायद्याखाली झालेली विक्री माझ्या वडीलांनी त्यांच्या हयातीत आव्हानीत केली नव्हती.

**१५.** ***प्रश्नः*** *सदरची विक्री गोपाळ दाजी शिंदे यांचे वारस नामे – गंगाराम, गणपत, श्रीपत व अनंत यांनी देखील आव्हानीत केली नव्हती, हे खरे का?*
***उत्तरः*** *गंगाराम, गणपत, अनंत हे लोक सदर विक्री आव्हानीत करण्यासाठी त्यावेळी हयातीत नव्हते.*

**१६.** हे म्हणणे खरे आहे की, गंगाराम, गणपत, अनंत व श्रीपत यांच्या वारसांनी सदर कुळ कायद्यातंर्गत झालेली विक्री आव्हानीत केलेली नाही. हे म्हणणे खरे आहे की, सदर कुळ कायद्याअंतर्गत झालेलया मिळकतींच्या विक्रीचे प्रमाणपत्र प्रतिवादी क्र. ०१ च्या नावे आजही कायम आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर मिळकतींचे आकारफोड पत्रक व गुणाकारपत्रक सदरी प्रतिवादी क्र. ०१ च्या वडीलांचे नाव होते. हे म्हणणे खरे आहे की, सदरचे आकारफोड पत्रक आजतागायत कायम आहे.

**१७.** हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ०१ हा कायमस्वरुपी कोंडगाव येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ने माझ्या भावाला विक्री केलेल्या क्षेत्रामध्ये माझ्या भावाने घर बांधलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर घराबाबत मी प्रस्तुत दाव्यात कोणतीही तक्रार केलेली नाही. हे मला माहिती नाही की, माझ्या वडीलांना सदर मिळकतींच्या सातबारा उताऱ्यावरील नोंदीची, आकारफोड पत्रकाची माहिती होती, अगर कसे.

**१८.** हे म्हणणे खरे नाही की, दावा मिळकत क्रमांक ०८ – सर्व्हे क्रमांक ०५ हिस्सा क्रमांक ०२ ही मिळकत प्रतिवादी क्र. २६ यांच्या वडीलांकडे पूर्वीपासून वहीवाटीस होती. *(साक्षीदारास निशाणी क्रमांक १०८ कडील अर्ज दाखविण्यात आला).* सदरच्या अर्जावर माझीच स्वाक्षरी असुन तो मीच दाखल केलेला आहे. सदर अर्जातील मजकुर वाचुन मी सांगतो की, 'तो मजकुर बरोबर' आहे. हे म्हणणे खरे आहे की, सदर अर्जामध्ये प्रतिवादी क्र. २६ च्या वहीवाटीस आम्ही आजतागायत हरकत घेतली नाही, असा मजकुर नमुद आहे. हे मला माहिती नाही की, प्रतिवादी क्र. २६ ला सदर मिळकतीची मा. जिल्हाधिऱ्यांची पुर्व परवानगी घेवुन प्रतिवादी क्र. ०१ ने विक्री केली होती, किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. २६ ला प्रतिवादी क्र. ०१ ने लिहुन दिलेल्या खरेदीखताच्या आधारे झालेल्या फेरफार नोंदीविरुध्द मी अपील दाखल केले होते. हे मला माहिती नाही की, सदर फेरफाराची नोंद मा. अप्पर आयुक्त, कोकण विभाग, मुंबई यांच्यापर्यंत कायम झाली, किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, प्रतिवादी क्र. ०१ ने ज्या काही विक्रीसाठी परवानग्या घेतल्या होत्या त्या विरुध्द मी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल केली नाही.

**१९.** हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे क्र. ०५ हिस्सा क्र. ०२ या मिळकतीमध्ये प्रतिवादी क्र. २६ चे वडील तुकाराम पांडुरंग बांडागळे यांचे घर होते. हे म्हणणे खरे आहे की, तुकाराम पांडुरंग बांडागळे हे त्यांच्या कुटूंबासमवेत त्या घरामध्ये राहत होते. साक्षीदार पुढे सांगतो की, ते बेकायदेशीररीत्या राहत होते. हे म्हणणे खरे आहे की, सदर घरामध्ये तुकाराम पांडुरंग बांडागळे त्यांच्या कुटुंबियासमवेत बेकायदेशीररीत्या राहत

असल्याबाबत दाव्यात किंवा माझ्या पुराव्याच्या प्रतिज्ञापत्रात कोठेही उल्लेख केलेला नाही. हे म्हणणे खरेआहे की, तुकाराम पांडुरंग बांडागळे हे राहत असलेल्या घराचा क्र. ५१४ असा होता. हे मला माहिती नाही की, सदर घराला ३१९ हा क्रमांक देण्यात आला. हे मला माहिती नाही की, तुकाराम बांडागळे यांच्या मृत्यूनंतर सदरचे घर त्यांची पत्नी विजयालक्ष्मी तुकाराम बांडागळे यांच्या नावे झाले, किंवा कसे. हे मला सांगता येणार नाही की, प्रतिवादी क्र. २६ हे सदर घरामध्ये त्यांच्या आई–वडीलांसोबत राहत होते, अगर कसे. हे म्हणणे खरे नाही की, सदरचे घर जुने होवुन मोडकळीस आले होते. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी क्र. २६ सुरेश बांडगाळे यांनी सदर घराचे सक्षम अधिकारी यांची परवानगी घेवुन त्याचे बांधकाम सुरु केले.

**२०.** हे म्हणणे खरे नाही की, सर्व्हे नंबर ०५ हिस्सा नंबर ०२ ही मिळकत सुरेश बांडागळे यांच्या एकटया मालकी वहीवाटीची आहे. हे मी पाहिले नाही की, सदर मिळकतीचा सातबारा उतारा हा सुरेश बांडागळे यांच्या एकटयाच्या नावे आहे. हे मला माहिती नाही की, सर्व्हे नंबर ०५ हिस्सा नंबर ०२ ही मिळकत प्रतिवादी क्र. ०१ ने मालकी हक्काने प्रतिवादी क्र. २६ ला दिनांक २९/०५/२०१५ रोजी विक्री केली, किंवा कसे. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकत क्र. ०१ ते ०८ या प्रतिवादी क्र. ०१ च्या एकटयाच्या मालकी वहीवाटीच्या आहेत.

**२१.** हे म्हणणे खरे आहे की, सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे अनंत यास माझ्या एकटया वडीलांनी कुटूंबाच्या उत्पन्नातुन दावा मिळकत क्रमांक ०९ ही खरेदी करुन ती त्याच्या नावावर करुन दिल्याची बाब दाखविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. साक्षीदार सांगतो की, सदर कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध आहेत. हे म्हणणे खरे आहे की, सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे गंगाराम यासही माझ्या एकटया वडीलांनी कुटूंबाच्या उत्पन्नातुन दावा मिळकत क्रमांक १० ते १२ या एकत्र कुटुंबातील त्यांच्या हिश्यापोटी एकत्र कुटूंबातील उत्पन्नातुन खरेदी करुन दिल्याची बाब दाखविण्याकरीता मी कागदोपत्री पुरावा अभिलेखावर दाखल केला नाही. साक्षीदार सांगतो की, सदर

कागदपत्रे माझ्याकडे उपलब्ध असुन, मी ती दाखल करु शकतो. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रात नमुद केल्याप्रमाणे गणपत यास त्याच्या व्यवसायीक कारणामुळे सन १९६२ साली माझे वडीलांनी रक्कम रुपये ३०,०००/– एकत्र कुटुंबातील त्याच्या हिश्यापोटी दिले होते, ही बाब दाखविण्याकरीता कोणताही कागदोपत्री पुरावा मी अभिलेखावर दाखल केला नाही.

२२. हे म्हणणे खरे आहे की, माझी साक्ष होण्यापुर्वी मी माझा मुलगा – मंदार प्रकाश शिंदे याच्या नावे मुखत्यारपत्र करुन दिले होते. हे म्ळणणे खरे आहे की, माझा मुखत्यार म्हणुन मंदार शिंदे याने माझ्या साक्षी पुर्वी त्याची साक्ष या दाव्यात नोंदविलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मंदारने साक्ष देण्यापुर्वी माझ्याकडुन सदर दाव्याची संपुर्ण माहिती घेतली होती. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती संदर्भात माझ्याकडुन माहिती घेण्यापुर्वी मंदार यास वैयक्तिक माहिती होती.

२३. हे म्हणणे खरे आहे की, दावा मिळकती क्रमांक ०१ ते ०८ संदर्भात कुळ म्हणुन मी किंवा माझ्या वडीलांनी आजतागायत हक्क शाबीत करुन घेतला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासाच्या प्रतिज्ञापत्रातील परीच्छेद क्रमांक ०१ ते ०८ मधील नमुद केलेला संपूर्ण मजकुर चुकीचा आहे. हे म्हणणे खरे नाही की, सदर दावा मिळकतींशी माझा व माझ्या वडीलांचा कोणताही संबंध नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, सदर मिळकतींची किंमत वाढल्यामुळे मी प्रतिवादी विरुध्द खोटा व खोडसाळ दावा दाखल केला आहे.

**उलटतपास पुर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्विकृत,

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.09.11 18:34:50 +0530

**(रोहिणी आर. कुलकर्णी)**

दिनांक ११.०९.२०२५ दिवाणी न्यायाधीश क.स्तर, देवरुख,

देवरुख. जि. रत्नागिरी.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file are same, word to word, as per the original order/judgment/evidence.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | S. A. Bhale |
| Court name | : | Civil Judge, J. D. and J.M.F.C., Devrukh. |
| Date | : | 11/09/2025 |
| Order signed by the presiding officer on | : | 11/09/2025 |
| Order uploaded on | : | 11/09/2025 |